Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

M

Paper-III
MARATHI

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....

(Name) .....

2. (Signature) .....

(Name) .....

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .....

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

AUG - 01315

Time Allowed : 2½ Hours] **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **20** Number of Questions in this Booklet : **75**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

Marathi
Paper III
मराठी
प्रश्नपत्रिका III

Time Allowed : 2½ Hours] **[Maximum Marks : 150**

Note : This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. 'ग्रंथु निका जाला : परि निवृतांजोगा नव्हेचि:' असे कोणी म्हटले आहे ?

   (A) बाइदेवोबास

   (B) नागदेवाचार्य

   (C) परशरामबास

   (D) रवळोबास

2. ज्ञानदेवांच्या पसायदानाची आठवण करून देणारी संत तुकारामांची रचना कोणती ?

   (A) जन्ममरण पुरे बापा·····

   (B) हेचि दान देगा देवा

   (C) घाली येरझारा पंढरीशी

   (D) सुखे येतो घरा नारायण

3. 'तुझी संगती नाही कामाची
   मी सुंदरा कोवळ्या मनाची'
   ही पदरचना कोणाची आहे ?

   (A) संत नामदेव

   (B) संत एकनाथ

   (C) होनाजीबाळा

   (D) मध्वमुनिश्वर

4. 'संतकाव्य महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचा आरसा असेल तर शाहिरी काव्य राजकीय जीवनाचा आरसा आहे.' हे विधान कोणी केले आहे ?

   (A) म. वा. धोंड

   (B) म. ना. अदवंत

   (C) रा. शं. वाळिंबे

   (D) गंगाधर मोरजे

5. 'शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' या बखरीचा कर्ता कोण ?

(A) त्रिंबक सदाशिव कुंटे

(B) कृष्णाजी अनंत सभासद

(C) मल्हार रामराव चिटणीस

(D) खंडो बल्लाळ चिटणीस

6. प्राचीन कवितेचे वेचे असणारा 'नवनीत' नावाचा संग्रह कोणी संपादित केला ?

(A) वा. ना. देशपांडे

(B) परशुराम बल्लाळ गोडबोले

(C) का. र. कीर्तीकर

(D) आनंदराव कृष्णाजी टेकाडे

7. अनिल बर्वे यांनी पुढीलपैकी कोणती पुस्तके लिहिली आहेत ? योग्य पर्याय निवडा.

(1) थँक्यू मिस्टर ग्लाड

(2) सरकारनामा

(3) अकरा कोटी गॅलन पाणी

(4) सोनेरी टोळी

पर्याय :

(A) (2) आणि (4) बरोबर

(B) (1) आणि (3) बरोबर

(C) सर्व पर्याय बरोबर

(D) सर्व पर्याय चूक

8. कथासंग्रह आणि त्यांचे लेखक यांच्या जोड्या जुळवा आणि उचित पर्याय ओळखा :

(1)	निळासावळा	(5)	मिलिंद बोकिल
(2)	गंधर्व	(6)	रंगनाथ पठारे
(3)	उदकाचिया आर्ती	(7)	श्याम मनोहर
(4)	स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग	(8)	बाळकृष्ण प्रभुदेसाई
		(9)	जी. ए. कुलकर्णी

पर्याय :

(A) (1)–(9), (2)–(8), (3)–(5), (4)–(6)

(B) (1)–(8), (2)–(9), (4)–(5), (3)–(6)

(C) (1)–(6), (2)–(5), (3)–(9), (4)–(7)

(D) (1)–(7), (2)–(6), (3)–(8), (4)–(9)

9. 1970 च्या दशकात 'नाटक व रंगभूमी' या विषयाला वाहिलेले नियतकालिक कोणते होते ?

(A) रंगभूमी

(B) भरतशास्त्र

(C) नाटक

(D) नाट्यवार्ता

10. 'स्पर्शाची पालवी' या गो. वि. करंदीकरांच्या ललितलेखनावर फडके-खांडेकरी शैलीचा प्रभाव असला तरी त्यांच्या पुढील ललितलेखन स्वतंत्र शैलीचे आहे :

(A) संपूर्ण विधान बरोबर आहे

(B) संपूर्ण विधान चूक

(C) उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक

(D) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

11. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द फारसी भाषेतून मराठी भाषेत आले आहेत ?

(A) बरड, मात, कवाड

(B) मामला, भीड, माणूस

(C) खर्च, गोंधळ, कवाड

(D) शिपाई, उस्तवारी, शिलेदार

12. शिर, मस्तक, डोस्कं यामध्ये कोणत्या प्रकारचा अर्थ समान आहे ?

(A) शैलीगत अर्थ

(B) सांकल्पनिक अर्थ

(C) भावपर अर्थ

(D) साहचर्यपर अर्थ

13. वैद्य-गुणे वादामुळे प्रामुख्याने कोणत्या मुद्द्यांच्या विचारात चालना मिळाली ?

(A) आर्यभारतीय व द्रविड भाषाकूळ संबंध

(B) आर्यांचे द्विरागमन

(C) मराठीचा उत्पत्तिकाळ

(D) आंतरवर्तुळ-बहिर्वर्तुळ वर्गीकरण

14. पुढीलपैकी कोणता विशेष प्रमाणभाषेचा **नाही** ?

(A) निरनिराळ्या गटांकडून परस्परसंपर्कासाठी वापर

(B) लेखन व्यवहारात प्राधान्य

(C) अनौपचारिक संदर्भातील वापर

(D) औपचारिक संदर्भातील वापर

15. 'ऋ' बद्दल 'अ', 'ई', 'उ', 'र', 'रि' हे पर्याय स्वीकारण्याची प्रवृत्ती मराठीने कोणत्या भाषेपासून घेतली ?

(A) कन्नड भाषेपासून

(B) अपभ्रंश भाषेपासून

(C) संस्कृत भाषेपासून

(D) तमिळ भाषेपासून

16. 'शब्दार्थौ सहितौ काव्यम्' ही काव्याची व्याख्या कोणी सांगितली आहे ?

(A) वामन

(B) भामह

(C) मम्मट

(D) रुद्रट

17. मम्मटाच्या प्रयोजनविषयक कारिकेतील कोणते प्रयोजन कालबाह्य ठरते ?

(A) आनंद

(B) कीर्ती

(C) अशुभनिवारण

(D) कान्तासम्मित उपदेश

18. 'रीतिरात्मा काव्यस्य' या व्याख्येत वामनाला कोणत्या प्रकारची रचना अभिप्रेत आहे ?

(A) गुणयुक्त पद

(B) बंधगुण

(C) शब्दगुण

(D) गुणयुक्त रचना

19. रससिद्धान्ताचे विवरण करताना 'स्थायीभावांसाठी' भावबंध ही संकल्पना कोणी मांडली आहे ?

(A) रा. श्री. जोग

(B) द. के. केळकर

(C) मा. गो. देशमुख

(D) स. रा. गाडगीळ

20. आचार्य जावडेकरांनी कोणता रस सुचविला आहे ?

(A) क्रांती

(B) वत्सल

(C) प्रेयान्

(D) भक्ती

21. साहित्य समीक्षेच्या पद्धती म्हणजे साहित्याकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन आहेत, परंतु यातील कोणताही एक दृष्टिकोन साहित्यकृतीचे मूल्य निर्धारित करू शकत **नाही** ?

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक

22. 'जास्वंद' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) ग्रेस

(B) गंगाधर गाडगीळ

(C) इंदिरा संत

(D) माधव आचवल

23. 'अनिमा' ही संज्ञा कशाला उद्देशून वापरली जाते ?

(A) स्त्रीतत्व

(B) पुरुषतत्व

(C) मन

(D) बोधना

24. बा. सी. मर्ढेकरांच्या 'पाणी' या कादंबरीत कोणत्या प्रकारच्या शैलीचे उपयोजन केले आहे ?

(A) प्रासादिक

(B) दीर्घ-सामासिक रचनायुक्त

(C) माधुर्ययुक्त

(D) संज्ञाप्रवाही

25. खालील पर्यायामधून योग्य पर्याय निवडून जोड्या जुळवा :

(1)	टीका स्वयंवर	(5)	वा. भा. पाठक
(2)	टीका आणि टीकाकार	(6)	श्री. के. श्रीरसागर
(3)	मराठी टीका	(7)	भालचंद्र नेमाडे
(4)	टीकाविवेक	(8)	वसंत दावतर
		(9)	श्रीधर तिळवे

पर्याय :

(A) (1)–(7), (2)–(5), (3)–(8), (4)–(6)

(B) (1)–(9), (2)–(8), (3)–(5), (4)–(7)

(C) (1)–(8), (2)–(7), (3)–(9), (4)–(5)

(D) (1)–(6), (2)–(9), (3)–(5), (4)–(8)

26. शोकात्मिका व सुखात्मिका या नाट्यवर्गीकरणाची दखल घ्यायला आधुनिक कलेने नकार दिला आहे, हे मत कोणी मांडले ?

(A) टॉमन मान

(B) अर्नेस्ट कसिरर

(C) एल. सी. नाईट्स

(D) रोलां बार्थ

27. साहित्यप्रकारांच्या संदर्भात लेखनकरारांची संकल्पना कोणी मांडली आहे ?

(A) हेरॉल्ड ब्लूम

(B) जोनाथन कलर

(C) नॉर्थ्रोप फ्राय

(D) केनेथ ब्रुक

28. सुझान लँगरच्या मते 'कालातीत वर्तमान' हा कोणत्या साहित्यप्रकाराचा विशेष आहे ?

(A) कथा

(B) कादंबरी

(C) कविता

(D) नाटक

29. साहित्यप्रकारांचे मिथकलक्ष्यीवर्गीकरण पुढीलपैकी कोणत्या समीक्षकाने सुचविले आहे ?

(A) हेन्री फील्डिंग

(B) आय. ए. रिचर्ड्स

(C) सी. जी. युंग

(D) नॉर्थ्रोप फ्राय

30. कथनमीमांसेच्या आधारे कोणत्या साहित्यप्रकाराचे विश्लेषण करता येते ?

(A) लावणी

(B) भावकविता

(C) कादंबरी

(D) नाटक

31. 'सरस्वती महल' या नावाचे ग्रंथालय कोठे आहे ?

(A) औरंगाबाद

(B) पुणे

(C) वाई

(D) तंजावूर

32. इ.स. 1875 साली स्थापन झालेल्या 'आर्यसमाजा'चे संस्थापक कोण ?

(A) स्वामी दयानंद सरस्वती

(B) स्वामी नृसिंह सरस्वती

(C) सरस्वती गंगाधर

(D) स्वामी स्वरूपानंद

33. पेशवाईतील रमणा देण्याची पद्धती बंद करून ब्रिटिशांनी 'दक्षिणा प्राइझ कमिटी' ची स्थापना केली; या कमिटीमार्फत दिले जाणारे ग्रंथपुरस्कार केवळ ब्राह्मण लेखकांना दिले जावेत असा नियम ही त्यात होता :

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर

34. 'नेटिव स्कूल ॲण्ड स्कूल बुक' या सोसायटीने मुद्रणासाठी देवनागरी लिपी स्वीकारण्याचा ठराव कोणत्या वर्षी केला ?

(A) इ.स. 1811

(B) इ.स. 1815

(C) इ.स. 1820

(D) इ.स. 1900

35. मुरळीप्रथेला विरोध करणारे समाजसुधारक कोण ?

(A) गो. ग. आगरकर

(B) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

(C) बाळशास्त्री जांभेकर

(D) बाळ गंगाधर टिळक

36. 'अभिरूची : ग्रामीण आणि नागर' या ग्रंथाचे संपादक कोण ?

(A) वि. म. कुलकर्णी

(B) गो. म. कुलकर्णी

(C) द. भि. कुलकर्णी

(D) वा. ल. कुलकर्णी

37. लोकहितवादी यांची 'शतपत्रे' मुळात कोणत्या नियतकालिकेतून प्रकाशित झाली होती ?

(A) प्रभाकर

(B) मनोरंजक

(C) विविधज्ञान विस्तार

(D) ज्ञानोदय

38. राजकीय स्वातंत्र्याहून सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होणे ही गोष्ट आगरकर आणि म. फुले यांनी महत्त्वाची मानली होती; पुढे आंबेडकरांनी ही या मताचा पुरस्कार केला :

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर

39. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दी-निमित्त 'जनता पत्रातील लेख' हा लेखसंग्रह कोणी संपादित केला ?

(A) रत्नाकर गणवीर

(B) गंगाधर पानतावणे

(C) वसंत मून

(D) अरूण कांबळे

40. 'विज्ञान आणि समाज' ह्या वि. दा. सावरकरांच्या लेखसंग्रहाचे संपादन कोणी केले ?

(A) भा. द. खेरं

(B) प्र. न. परांजपे

(C) प्र. न. जोशी

(D) रा. भि. जोशी

41. बसवकल्याण येथे अनुभव मंडपाची स्थापना कोणी केली ?

(A) बिज्जळ

(B) बसवेश्वर

(C) चन्नबसवेश्वर

(D) ज्ञानेश्वर

42. साहित्यसंस्था आणि त्यांची मुखपत्रे यांच्या जोड्या लावा आणि दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून जोड्या जुळवा :

(1)	आंध्रप्रदेश साहित्य परिषद	(5)	प्रतिष्ठान
(2)	विदर्भ साहित्य संघ	(6)	संशोधनपत्रिका
(3)	मराठवाडा साहित्य परिषद	(7)	अनुबंध
(4)	मराठी साहित्य मंडळ गुलबर्गा	(8)	पंचधारा
		(9)	युगवाणी

पर्याय :

(A) (1)–(8), (2)–(9), (3)–(5), (4)–(7)

(B) (1)–(6), (2)–(7), (3)–(5), (4)–(9)

(C) (1)–(8), (2)–(5), (3)–(7), (4)–(6)

(D) (1)–(9), (2)–(8), (3)–(6), (4)–(7)

43. 'साठा उत्तराची कहाणी' या कादंबरीमध्ये कोणत्या विषयाचे चित्रण आले आहे ?

(A) पर्यावरण चळवळ

(B) स्त्रीवादी चळवळ

(C) स्वातंत्र्य लढाचे चित्रण

(D) भाषाशुद्धीची चळवळ

44. 'जेव्हा माणूस जागा होतो' या ग्रंथाच्या लेखिका कोण ?

(A) गोदावरी परूळेकर

(B) प्रेमा कंटक

(C) दुर्गा भागवत

(D) गोदावरी केतकरी

45. 'ब्रिटिश सत्तेला प्रखर विरोध' हे आशयसूत्र असणारे कृ. प्र. खाडिलकरांचे नाटक कोणते ?

(A) त्रिदंडी संन्यास

(B) सवाई माधवरावाचा मृत्यू

(C) विद्याहरण

(D) किचकवध

46. 'वज्राघात' या कादंबरीतील नायिकेचे नाव काय ?

(A) मेहेरजान

(B) मेहेरून्निसा

(C) मेहेरजबीन

(D) नूरजहाँ

47. 'रणांगण' ही कादंबरी कोणत्या साली प्रकाशित झाली ?

(A) इ.स. 1939

(B) इ.स. 1940

(C) इ.स. 1941

(D) इ.स. 1937

48. 'हरपले श्रेय' मधील अनुभूती कोणत्या प्रकारची आहे ?

(A) अस्तित्ववादी

(B) वास्तववादी

(C) अभिजाततावादी

(D) स्वच्छंदतावादी

49. पुढीलपैकी कोणते आशयसूत्र 'रणांगण' या कादंबरीला चपखलपणे लागू पडते ?

(A) धार्मिक तेढ

(B) महायुद्धाचे वर्णन

(C) दुसऱ्या महायुद्धाचे दुष्परिणाम

(D) महाभारतीय युद्धाचे दुष्परिणाम

50. पुढीलपैकी कोणत्या कादंबरीला 'साहित्य अकादमी' पुरस्कार मिळाला आहे ?

(A) सूड

(B) धग

(C) ताम्रपट

(D) कोसला

51. जातककथांचे संपादन कोणी केले ?

(A) तारा भवाळकर

(B) दुर्गा भागवत

(C) वैदेही कोळेपूर

(D) शैला लोहीया

52. 'लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) रा. चिं. ढेरे

(B) प्रभाकर मांडे

(C) मधुकर वाकोडे

(D) गंगाधर मोरजे

53. डक्कलवारांच्या जातीपुराणांचा अभ्यास कोणी केला आहे ?

(A) शरद व्यवहारे

(B) श्री रं. कुलकर्णी

(C) प्रभाकर मांडे

(D) रामदास डांगे

54. 'मराठवाड्यातील लोककथा' हा ग्रंथ कोणी संपादित केला ?

(A) प्रभाकर मांडे

(B) यू. म. पठाण

(C) शरद व्यवहारे

(D) हरिश्चंद्र बोरकर

55. झाडीबोलीतील लोकनाट्याचा अभ्यास कोणी केला आहे ?

(A) मधुकर वाकोडे

(B) मदन कुलकर्णी

(C) हरिश्चंद्र बोरकर

(D) शैला लोहीया

56. 'द इनफ्ल्यूअन्स ऑफ इंग्लिश ऑन नाईंटिन्थ सेंच्युरी मराठी प्रोज स्टाईल' हा तौलनिक साहित्याभ्यासात मोलाची भर घालणारा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) आनंद पाटील

(B) निशिकांत ठकार

(C) भालचंद्र नेमाडे

(D) रवींद्र किंबहुने

57. पुढीलपैकी कोणत्या मराठी नाटककाराची नाटके इब्सेनी प्रभावातून आली आहे ?

(A) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

(B) श्री. कृ. कोल्हटकर

(C) रा. ग. गडकरी

(D) मो. ग. रांगणेकर

58. तौलनिक साहित्याच्या वेगवेगळ्या 'राष्ट्रीय' मतप्रणालींचा आढावा पुढीलपैकी कोणत्या अभ्यासकाने घेतला आहे ?

(A) रेमाक

(B) एफ्. एल. ल्यूकस

(C) हॅरॉल्ड ब्लूम

(D) एम. एच. अब्रॅम्स

59. मराठीतील पुढीलपैकी कोणत्या कवीवर अस्तित्ववादाचा प्रभाव आहे ?

(A) रजनी परूळेकर

(B) ना. धों. महानोर

(C) दिलीप चित्रे

(D) अनिल

60. 'तौलनिक साहित्याभ्यास : तत्वे आणि दिशा' या ग्रंथाचे संपादन कोणी केले आहे ?

(A) डॉ. चंद्रशेखर जहागीरदार

(B) म. द. हातकणंगलेकर

(C) आनंद पाटील

(D) रवींद्र किंबहुने

61. 'सेकंड स्टेज' या ग्रंथाच्या लेखिका कोण ?

(A) ज्युलिया क्रिस्तिवा

(B) बेटी फ्रिडम

(C) गुबर सुझन

(D) मिलेट केट

62. 'मिळून सा-याजणी' या नियतकालिकाच्या संपादिका कोण ?

(A) विद्या बाळ

(B) छाया दातार

(C) शारदा साठे

(D) मंगला खिंवसरा

63. 'दुस्तर हा घाट' या कादंबरीच्या लेखिका कोण आहेत ?

(A) निर्मला देशपांडे

(B) गौरी देशपांडे

(C) सानिया

(D) अंबिका सरकार

64. लिंग आणि लिंगभाव यातील भेद पुढीलपैकी कोणत्या अभ्यासकाने सविस्तर सांगितला आहे ?

(A) व्हर्जिनिया वुल्फ

(B) फायरस्टोन

(C) इरिगेरी

(D) सिमॉन द बोव्हा

65. पुढीलपैकी कोणता कथासंग्रह प्रिया तेंडुलकर यांनी लिहिलेला आहे ?

(A) ज्याचा त्याचा प्रश्न

(B) चाहूल

(C) बाहुल्या

(D) आहे हे असं आहे

66. 'खळाळ' हा कथासंग्रह कोणाचा आहे ?

(A) भास्कर चंदनशीव

(B) आनंद यादव

(C) नागनाथ कोत्तापल्ले

(D) वासुदेव मुलाटे

67. रा. रं. बोराडे यांनी पुढीलपैकी कोणती कादंबरी लिहिली आहे ?

(A) आभाळ

(B) ओझं

(C) चिताक

(D) पाचोळा

68. 'नागीण' या कथासंग्रहाचे लेखक कोण ?

(A) चंद्रकुमार नलगे

(B) महादेव मोरे

(C) चारूता सागर

(D) रंगनाथ पठारे

69. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील जनजीवनाचे चित्रण करणारे कथाकार कोण ?

(A) महादेव मोरे

(B) आनंद यादव

(C) मोहन पाटील

(D) शरणकुमार लिंबाळे

70. 'सांज' 'ढग' हे कथासंग्रह कोणत्या लेखकाचे आहेत ?

(A) शंकरराव खरात

(B) व्यंकटेश माडगुळकर

(C) सखा कलाल

(D) रा. रं. बोराडे

71. 'झुलवा' या कादंबरीचे लेखक कोण आहेत ?

(A) बा. स. हाटे

(B) बाबुराव बागूल

(C) उत्तम बंडु तुपे

(D) शंकरराव खरात

72. बाबूराव बागूल यांनी पुढीलपैकी कोणता कथा-संग्रह लिहिला आहे ?

(A) मरण स्वस्त होत आहे

(B) मरणकळा

(C) पेटलेले आकाश

(D) हकिकत आणि जटायू

73. 'विद्रोही कवितां'चे संपादन कोणी केले आहे ?

(A) गजमल माळी

(B) केशव मेश्राम

(C) बंधुमाधव

(D) राजा ढाले

74. 'काळोखाच्या गर्भात' हे नाटक कोणाचे आहे ?

(A) प्रेमानंद गज्वी

(B) रामनाथ चव्हाण

(C) भि. शि. शिंदे

(D) टेक्सास गायकवाड

75. 'अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) यशवंत मनोहर

(B) शरणकुमार लिंबाळे

(C) लक्ष्मण माने

(D) शरद पाटील

ROUGH WORK